२५६

## MAHARASHTRA ACT No. XLI OF 1974

### THE MAHARASHTRA RESETTLEMENT OF PROJECT DISPLACED PERSONS, ACT, 1976

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती, दिनांक २९ जुलै १९७६ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एस. डब्ल्यू. धुरंधर,
अपर सचिव, महाराष्ट्र राज्य,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XLI OF 1976

### AN ACT TO PROVIDE FOR THE RESETTLEMENT OF CERTAIN PERSONS DISPLACED FROM LANDS WHICH ARE ACQUIRED FOR PROJECTS OF PUBLIC UTILITY AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात, दिनांक १२ ऑगस्ट १९७६ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला]

## सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१.

**सार्वजनिक उपयोगाच्या प्रकल्पांकरिता संपादन केलेल्या जमिनींतून विस्थापित झालेल्या विवक्षित व्यक्तींची पुनर्वसाहत व त्यांच्याशी संबंधित बाबी यांसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी**, सार्वजनिक उपयोगाच्या कोणत्याही प्रकल्पांकरिता संपादित केलेल्या जमिनींतून विस्थापित झालेल्या विवक्षित व्यक्तींची पुनर्वसाहत व त्यांच्याशी संबंधित बाबी यांसाठी तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या सत्ताविसाव्या वर्षी याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

### प्रकरण एक

### प्रारम्भिक

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींची पुनर्वसाहत अधिनियम, १९७६ असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**

(२) तो संपूर्ण महाराष्ट्रास लागू होईल.

(३) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेपासून अमलात येईल.

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा अपेक्षित नसेल तर,—

(१) एखाद्या प्रकल्पाच्या संबंधात "बाधित परिमंडल" म्हणजे, कलम १५ अन्वये त्या प्रकल्पाखालील बाधित परिमंडलाचे क्षेत्र म्हणून घोषित केलेल्या जमिनी ;

(२) "शेतजमीन" या संज्ञेत बागायत करणे, पिके, गवत किंवा बागायती उत्पन्न काढणे, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, पशुधन पैदास, औषधी वनस्पतींची लागवड करण्यात येणारे रोपमळे यासाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याजोग्या जमिनींचा आणि शेतकऱ्याने स्वतःची जमीन किंवा तिचा भाग यांचा आपल्या गुरांच्या चराईसाठी केलेला उपयोग, यांचा समावेश होतो, परंतु केवळ लाकूड तोडणे किंवा गवत कापणे यांसाठी वापरलेल्या जमिनीचा समावेश त्यात होत नाही ;

(३) कोणत्याही प्रकल्पाच्या संबंधात, "लाभान्वित परिमंडल" म्हणजे, त्या प्रकल्पाखालील, लाभान्वित परिमंडलाचे क्षेत्र म्हणून कलम १५ अन्वये घोषित करण्यात आलेल्या जमिनी ;

(४) "अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ ;

(५) "कसणे" म्हणजे, कोणतेही शेतीविषयक काम करणे व "लागवड" या शब्दप्रयोगाचा अर्थ तदनुसार लावण्यात येईल ;

(६) "संचालक" म्हणजे, कलम ४ अन्वये नेमलेला पुनर्वसाहत संचालक ;

(७) "विस्थापित व्यक्ती" म्हणजे, बाधित परिमंडलातील जिच्या जमिनीचे [ गावठाणातील (यात यानंतर ज्याचा "जुने गावठाण" असा उल्लेख करण्यात आला आहे) जमीन धरून ] एखाद्या प्रकल्पाच्या प्रयोजनाकरिता संपादन केल्यामुळे अशा जमिनीतून विस्थापित झालेला भोगवटादार किंवा कोणताही शेतमजूर ;

(८) "शेत मजूर" म्हणजे, बाधित परिमंडलात कोणतीही जमीन धारण न करणारी, परंतु ती जमीन ज्यात आहे असे क्षेत्र कलम १५ अन्वये बाधित परिमंडल म्हणून घोषित केले जाण्याच्या लगतपूर्वी त्या शेतजमिनीवर मुख्यतः शारीरिक श्रम करून आपला चरितार्थ चालविणारी आणि त्या जमिनीवर मुख्यतः शारीरिक श्रम करून स्वतःचा चरितार्थ चालवण्यापासून जिला मुकावे लागले आहे अशी व्यक्ती ;

(९) विस्थापित व्यक्तीच्या संबंधात, "कुटुंब" म्हणजे, विस्थापित व्यक्तीचे, अशी व्यक्ती आणि त्याची पत्नी किंवा तिचा पती, अज्ञान मुलगे, अविवाहित मुली, अज्ञान भाऊ किंवा बहिणी, वडील आणि आई आणि तिच्याबरोबर राहणाऱ्या व उपजीविकेसाठी तिच्यावर अवलंबून असणाऱ्या इतर व्यक्ती यांचे मिळून होणारे कुटुंब ;

(१०) "धारणजमीन" म्हणजे, भोगवटादार किंवा कूळ म्हणून किंवा त्या दोन्ही नात्यांनी, एखाद्या व्यक्तीने धारण केलेली एकूण जमीन ;

(११) "भूमि संकोष" म्हणजे, विस्थापित व्यक्तींच्या पुनर्वसाहतीकरिता उपलब्ध असतील अशा, कलम १३, पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या जमिनी ;

(१२) "प्रकल्प" म्हणजे, पाटबंधाऱ्यांच्या प्रयोजनांसाठी (यात यापुढे ज्यास "पाटबंधारे प्रकल्प" असे संबोधण्यात आले आहे) किंवा वीजनिर्मिती व पुरवठा यांसाठी किंवा वीजविषयक विकासाला पोषक अशा कोणत्याही कामासाठी (यात यापुढे ज्यास "विद्युत प्रकल्प" असे संबोधण्यात आले आहे) पाण्याचा पुरवठा करण्याकरिता असलेल्या कोणत्याही कामाचे बांधकाम, विस्तार किंवा सुधारणा आणि त्यात, ज्याच्या बांधकामामुळे, विस्तारामुळे किंवा सुधारणेमुळे किंवा विकासामुळे, परिणामी तशा कामासाठी वापरण्यात येतील त्या जमिनींतून व्यक्तींचे विस्थापन होते अशा, सार्वजनिक उपयुक्ततेच्या इतर कोणत्याही कामाचा समावेश होतो ;

(१३) एखाद्या प्रकल्पाच्या संबंधात, "पुनर्वसाहत अधिकारी" म्हणजे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी राज्य शासनाकडून लेखी आदेशाद्वारे, त्या प्रकल्पासाठी नियुक्त करण्यात आलेला तहसिलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसणारा अधिकारी ;

(१४) "जिल्हा परिषद" म्हणजे, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये स्थापन करण्यात आलेली जिल्हा परिषद ;

(१५) या अधिनियमात वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न दिलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अधिनियमात त्यांना अनुक्रमे नेमून दिलेले अर्थ असतील.

---

## प्रकरण दोन

### पुनर्वसाहत अधिकारी, त्यांच्या शक्ती व कर्तव्ये

३. विस्थापित व्यक्तींच्या पुनर्वसाहतीशी संबंधित सर्व बाबींमध्ये मुख्य नियंत्रणविषयक प्राधिकार राज्य शासनाचे अधीक्षण, निदेशन व नियंत्रण यांच्या अधीन, संचालकाकडे निहित राहील. पुनर्वसाहत-विषयक बाबींमध्ये मुख्य नियंत्रण-विषयक प्राधिकार.

४. (१) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, राज्य शासन,— पुनर्वसाहत संचालनालय.

(अ) पुनर्वसाहत संचालक ;

(ब) विभागीय आयुक्त ;

(क) एक किंवा अधिक पुनर्वसाहत उप-संचालक, (या अधिनियमात "उप-संचालक" असा निर्देश केलेले) ; आणि

(ड) एक किंवा अधिक पुनर्वसाहत अधिकारी आणि राज्य शासन, वेळोवेळी लेखी आदेशाद्वारे नियुक्त करील असे व अशी पदनामे असलेले इतर अधिकारी व कर्मचारी,

यांचे मिळून होणारे पुनर्वसाहत संचालनालय स्थापन करील.

(२) राज्य शासन, लेखी आदेशाद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या एका सचिवाची पदसिद्ध संचालक म्हणून नियुक्ती करील.

**स्पष्टीकरण**.—या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी "सचिव" या संज्ञेत, राज्य शासनाने पदनिर्देशित केलेला अपर सचिव किंवा कोणताही सह-सचिव यांचा समावेश होतो.

(३) एखाद्या प्रकल्पात समाविष्ट केलेले क्षेत्र ज्याच्या अधिकारितेत येते त्या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदचा मुख्य कार्यकारी अधिकारी हे अनुक्रमे पदसिध्द उप-संचालक (भूमि) व उप-संचालक (विकास) असतील.

५. संचालकाची पुढील कर्तव्ये असतील,— संचालकाची कामे.

(अ) विस्थापित व्यक्तींच्या पुनर्वसाहतीशी संबंधित सर्व बाबींवर राज्य शासनाला सल्ला देणे ;

(ब) राज्य शासनाच्या विस्थापित व्यक्तींच्या पुनर्वसाहतीशी संबंधित धोरणाच्या चौकटीत पुनर्वसाहत कार्यक्रमांचे कार्यान्वयन करणे ;

(क) विस्थापित व्यक्तींची पुनर्वसाहत वेगाने होण्याची निश्चिती करणे ;

(ड) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता निधीची तरतूद करण्यासाठी वार्षिक अर्थसंकल्प तयार करणे किंवा तयार करण्याची व्यवस्था करणे ;

(इ) राज्य शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाच्या अधीन, काही असल्यास, विस्थापित व्यक्तींच्या पुनर्वसाहतीसाठी विधिद्वारे रीतसर मंजूर केलेल्या अनुदानातून, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी त्याला योग्य वाटेल अशा अधिकाऱ्यांना व प्राधिकरणांना त्यांच्या गरजांनुसार अशा कालांतराने रकमा संवितरित करणे ;

(फ) पुनर्वसाहतीच्या क्षेत्रीय कामाचे पर्यवेक्षण करणे व ते काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना वेळोवेळी सल्ला देणे ;

(ग) विस्थापित व्यक्तींसाठी, एकतर प्रकल्पाशी संबंधित कोणत्याही कामावर किंवा अन्यथा व्यवहार्य असेल तेथवर रोजगाराची व्यवस्था करणे ; आणि

(ह) राज्य शासन वेळोवेळी लेखी आदेशाद्वारे त्यावर सोपवील अशी इतर कामे पार पाडणे.

आयुक्ताची कर्तव्ये. ६. राज्य शासनाच्या कोणत्याही आदेशाधीन,—

(अ) आयुक्ताच्या विभागातील विस्थापित व्यक्तींच्या पुनर्वसाहतीसंबंधीच्या कामात समन्वय साधणे व त्यावर देखरेख ठेवणे ;

(ब) विस्थापित व्यक्तींच्या शीघ्र पुनर्वसाहतीसंबंधी खात्री करून घेणे व त्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहतीसंबंधीचे काम पाहणाऱ्या अधिकाऱ्यांच्या सभा घेणे व त्याबाबतीत निर्णय घेणे आणि दुय्यम अधिकाऱ्यांना नेमून देण्यात आलेले काम त्यांच्याकडून करवून घेणे ;

(क) आपल्या विभागातील उप-संचालकाच्या किंवा उप-संचालकांच्या अर्थसंकल्पीय प्रस्तावांची छाननी करणे ;

(ड) त्याने निर्धारित केलेल्या गरजांनुसार उप-संचालकांना अनुदानांचे संवितरण करणे ;

(इ) कलम २० च्या पोट-कलम (१) च्या खंड (आय) मध्ये निर्देशिलेल्या सार्वजनिक उपयुक्तता, सुखसोयी व सेवा यांच्या दृष्टीने, राज्य शासनाने कलम २२ अन्वये सोपवलेल्या गावठाणाच्या मांडणीच्या कार्यान्वयनासंबंधात केलेली प्रगती आपणास कळविण्यासंबंधी संबंधित उप-संचालक (विकास) यास फर्मावणे आणि त्यास त्या प्रकरणातील परिस्थितीनुसार आवश्यक असे सहाय्य करणे ;

(फ) राज्य शासनाकडून त्यास नेमून देण्यात येतील अशी इतर कामे पार पाडणे;

ही आयुक्ताची कर्तव्ये असतील.

दुय्यम अधिकाऱ्यांना शक्ती व कर्तव्ये यांचे प्रत्यायोजन. ७. उप-संचालकास लेखी आदेशाद्वारे, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये त्यास प्रदान करण्यात आलेल्या शक्ती व त्याच्यावर लादण्यात आलेली कर्तव्ये तहसिलदारापेक्षा कमी दर्जाच्या नसणाऱ्या अधिकाऱ्यास किंवा आयुक्ताच्या मान्यतेने आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा राज्य शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यास प्रत्यायोजित करता येईल.

अधिकारी व कर्मचारी यांची अधीनता. ८. या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, या अधिनियमान्वये नियुक्त केलेला उप-संचालक व इतर सर्व अधिकारी आणि कर्मचारी हे संचालक व आयुक्त यांच्या अधीन असतील.

सल्लागार समित्यांची रचना. ९. विस्थापित व्यक्तींच्या शीघ्र पुनर्वसाहतीत राज्य शासनास सहाय्य करण्याच्या प्रयोजनार्थ त्याच्याकडे किंवा त्यांच्याकडे निर्देशित करण्यात येईल त्याप्रमाणे, विस्थापित व्यक्तींच्या शीघ्र पुनर्वसाहती-संबंधीच्या अशा बाबींवर शासनास किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास सल्ला देण्यासाठी, राज्य शासनास, वेळोवेळी, एका किंवा अधिक सल्लागार समित्यांची रचना करता येईल, सल्लागार समितीची रचना, तिच्या कामकाजाचे नियमन, तिच्या सदस्यांना देण्यात यावयाचे भत्ते किंवा फी, कोणतेही असल्यास, व त्याच्याशी आनुषंगिक सर्व बाबी, विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील :

परंतु, सल्लागार समितीचा सभापती बिनसरकारी व्यक्ती असेल आणि राज्य शासनाने नियुक्त केलेला अधिकारी उप-सभापती असू शकेल.

## प्रकरण तीन

## विस्थापित व्यक्तींची पुनर्वसाहत

विस्थापित व्यक्तींची पुनर्वसाहत. १०. राज्य शासन, या अधिनियमाचे उपबंध व तदन्वये केलेले नियम यांनुसार लाभान्वित परिसंडला-तील किंवा इतर गावांमधील किंवा क्षेत्रांमधील (त्या प्रयोजनार्थ राज्य शासनाने लेखी आदेशाद्वारे विनिर्दिष्ट केलेली गावे व क्षेत्रे) जमिनीवर शक्य तितक्या जास्त विस्थापित व्यक्तींची पुनर्वसाहत करील.

**प्रकल्पांना अधिनियम लागू करणे.**

११. (१) सार्वजनिक हिताच्या दृष्टीने, विस्थापित व्यक्तींच्या पुनर्वसाहतीसाठी तसे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे असे राज्य शासनाचे मत होईल तर, त्यास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या प्रकल्पासंबंधात या अधिनियमाचे उपबंध लागू असल्याचे घोषित करता येईल, व त्यानंतर, या अधिनियमाचे उपबंध अशा प्रकल्पास लागू होतील. बाधित किंवा लाभान्वित परिमंडलामध्ये येण्याची शक्यता असलेली गावे किंवा क्षेत्रे यांचादेखील विनिर्देश त्या अधिसूचनेमध्ये करण्यात येईल.

(२) ज्याच्यावर परिणाम होण्याचा संभव आहे अशा गावांत किंवा क्षेत्रांत व लाभान्वित परिमंडलात दवंडी पिटवून किंवा अन्य रीतीने तसेच परिमंडलातील काही ठळक जागी किंवा जागांवर आणि गावाच्या चावडीत व पंचायतीच्या कार्यालयात, कोणतेही असल्यास, तसेच पुनर्वसाहत अधिकाऱ्याच्या कार्यालयात अधिसूचनेची प्रत लावूनदेखील अशी घोषणा प्रसिद्ध करण्यात येईल.

**लाभान्वित परिमंडलातील जमिनीच्या हस्तांतरणावर, पोट-विभागणीवर किंवा विभाजनावर निर्बंध.**

१२. (१) त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही विधीत काहीही अंतर्भूत असले तरीही, **शासकीय राजपत्रा** मध्ये कलम ११ अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्यानंतर व लाभान्वित परिमंडलातील जमिनींच्या संपादनाचे सर्व कामकाज पूर्ण करण्यात आले आहे अशा अर्थाची घोषणा उप संचालकाकडून करण्यात येईपर्यंत, कलम ११ खालील अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गावांतील किंवा क्षेत्रांतील कोणत्याही जमिनीचे, राज्य शासनाची लेखी परवानगी असेल त्याशिवाय,—

(अ) विक्रीच्या रूपाने (दिवाणी न्यायालयाच्या डिक्रीची किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याच्या निवाड्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी करण्यातील विक्री धरून) किंवा देणगीच्या, विनिमयाच्या, पट्ट्याच्या किंवा अन्य रूपाने हस्तांतरण,

(ब) पोट-विभागणी (कोणत्याही न्यायालयाची किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याची डिक्री, निवाडा किंवा आदेश याद्वारे केलेले पोट-विभाजन धरून), किंवा

(क) विभाजन (कोणत्याही न्यायालयाच्या किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याच्या डिक्रीअन्वये किंवा आदेशाअन्वये केलेले विभाजन धरून), करण्यात येणार नाही.

(२) जमिनीच्या हस्तांतरणामुळे, पोट-विभागणीमुळे किंवा विभाजनामुळे या अधिनियमाचा उद्देश विफल होण्याची शक्यता आहे असे राज्य शासनाचे मत होईल तर, त्यास, अशी परवानगी देण्याचे नाकारता येईल.

(३) पोट-कलम (१) चे उल्लंघन करून केलेले जमिनीचे कोणतेही हस्तांतरण, पोट-विभागणी किंवा विभाजन निरर्थक व अप्रवर्ती असेल.

**जिच्यामधून व्यक्तींना विस्थापित करण्यात आले अशा जमिनीची मर्यादा व पुनर्वसाहत करण्यासाठी उपलब्ध असलेल्या जमिनींची मर्यादा निर्धारित**

१३. (१) कलम ११ अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्यावर, पुनर्वसाहत अधिकारी, या कलमाच्या उपबंधास अधीन राहून, जिच्यामधून लोकांना विस्थापित व्हावे लागण्याची शक्यता आहे अशा जमिनीची मर्यादा व विस्थापित व्यक्तींना देण्यासाठी जी उपलब्ध होऊ शकेल अशा जमिनीची मर्यादा निर्धारित करील. तसेच पुनर्वसाहत अधिकारी, निर्धारण करताना, जेथे विस्थापित व्यक्तींची पुनर्वसाहत करता येईल अशा जमिनींची जागा व नवीन गावठाणाची जागा, किंवा यथास्थिति, कोणत्याही विद्यमान गावठाणाच्या विस्ताराचे क्षेत्र दर्शवील ;

(२) एखाद्या गावठाणासाठी (यात यानंतर ज्याचा "नवीन गावठाण" असा निर्देश करण्यात आला आहे) किंवा यथास्थिति विद्यमान गावठाणाच्या विस्तारासाठी जागा निवडताना, पुनर्वसाहत अधिकारी पुढील गोष्टी विचारात घेईल :—

(एक) (विस्थापित व्यक्तींना देण्यासाठी राखून ठेवण्यात येणाऱ्या) पर्यायी शेतजमिनी नवीन गावठाणापासून किंवा यथास्थिति विद्यमान गावठाणाच्या विस्तारापासून (अशा शेतजमिनी व नवीन गावठाण किंवा विद्यमान गावठाणाचा विस्तार यामधील अंतर सर्वसाधारणतः ८ किलोमीटरपेक्षा अधिक असणार नाही) जवळ असतील ;

करणे व विवक्षित माहिती गोळा करणे.

(दोन) नवीन गावठाणातील किंवा गावठाणाच्या विस्तारातील किंवा त्याच्या परिसरातील पाण्याच्या साधनांची उपलब्धता किंवा अशा गावठाणात किंवा त्याच्या परिसरात विहीर खोदली असता पाणी लागण्याची शक्यता ;

(तीन) पोचमार्ग ;

(चार) घरे बांधण्यासाठी जमिनीची योग्यता ; व

(पाच) राज्य शासन लेखी आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा इतर बाबी.

(३) पुर्नवसाहत अधिकारी, विस्थापित व्यक्तींच्या पुनर्वसाहतीसाठी उपलब्ध असतील अशा जमिनींची सूची तयार करील, आणि असे करताना त्याला जे लाभान्वित परिमंडलात समाविष्ट करता येईल असे क्षेत्र किंवा जे कलम १० खाली विनिर्दिष्ट करता येईल असे क्षेत्र दर्शविता येईल अशा जमिनींमध्ये,—

(अ) सरकारी पडित जमिनी ;

(ब) वननिर्मूलनानंतर लागवडीसाठी उपलब्ध असलेली किंवा उपलब्ध होईल अशी सरकारी वनभूमी ;

(क) ज्या लाभान्वित परिमंडलात समाविष्ट करता येतील अशा किंवा ज्या कलम १० अन्वये विनिर्दिष्ट करण्यात येणाऱ्या कोणत्याही गावातील किंवा क्षेत्रातील आणि ज्या कलम १६ च्या उप-बंधानुसार, भूमिसंपादन अधिनियम, १८९४ अन्वये संपादित करता येतील अशा जमिनी ;

(ड) कलम १६ अन्वये संपादन केलेल्या जमिनी ;

(इ) राज्य शासनाकडे निहित व विस्थापित व्यक्तींच्या पुनर्वसाहतीसाठी उपलब्ध असलेली इतर कोणतीही जमीन ;

यांचा समावेश असेल.

(४) या कलमान्वये निर्धारण करण्याच्या प्रयोजनार्थ, प्रकल्पाच्या कार्यान्वयनाचा प्रभारी अभियंता (यात यानंतर ज्याचा "प्रकल्प अभियंता" असा निर्देश करण्यात आला आहे),—

(अ)—

(एक) जलद्वारांसह पाण्याचा साठा, व

(दोन) जलद्वारांशिवाय पाण्याचा साठा,—

अशा, निरनिराळ्या जलाशय पातळ्यांवर गावे दर्शवून, पाण्याखाली जाण्याचा संभव असलेले क्षेत्र दर्शविणारा नकाशा तयार करील किंवा तयार करण्याची व्यवस्था करील.

(ब) पाण्याखाली गेलेले क्षेत्र व प्रत्यक्षतः पाण्याखाली जाणारे सर्वेक्षण क्रमांक दर्शवून गावाचा नकाशा तयार करील किंवा तयार करण्याची व्यवस्था करील.

(क)—

(एक) प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या जमिनीची मर्यादा ;

(दोन) प्रत्येक गावातील सर्वेक्षण क्रमांक सूचीसह, प्रकल्पाद्वारे लाभ मिळण्याचा संभव असलेल्या जमिनीची मर्यादा ;

यासंबंधीची माहिती गोळा करील.

(५) पोट-कलम (४) अन्वये तयार करण्यात आलेले नकाशे आणि त्या पोट-कलमान्वये गोळा करण्यात आलेली माहिती, प्रकल्प अभियंत्याकडून पुनर्वसाहत अधिकाऱ्याकडे पाठविण्यात येईल.

(६) पोट-कलम (५) अन्वये नकाशे आणि माहिती मिळाल्यावर, पुनर्वसाहत अधिकारी पुढील गोष्टींच्या संबंधात माहिती गोळा करील—

(अ) पुनर्वसाहतीसाठी उपलब्ध असलेल्या सरकारी जमिनी, लाभान्वित परिमंडल होण्याचा संभव असलेल्या आणि कलम १६ च्या उपबंधान्वये संपादन कराव्या लागतील अशा जमिनींचा विस्तार ;

२६३

(ब) विस्थापित व्यक्तीच्या धारण जमिनीचा विस्तार, त्यामधून प्रकल्पासाठी संपादन करावयाच्या क्षेत्राचा विस्तार, प्रकल्पासाठी संपादन करावयाच्या बांधकामांची संख्या, प्रत्येक विस्थापित व्यक्तीच्या कुटुंबातील व्यक्तींची संख्या यासारखा, प्रकल्पामुळे बाधा पोहोचलेल्या व्यक्तींचा तपशील ;

(क) प्रकल्पाशी संबंधित बांधकाम हाती घेतल्यामुळे विस्थापित होण्याचा संभव असलेल्या व्यक्तींशी विशेषत: विचारविनिमय करून, नवीन गावठाणाची जागा किंवा विद्यमान गावठाणाचा विस्तार.

(७) पुनर्वसाहत अधिकारी, त्याने पोट-कलम (१) व (२) अन्वये केलेल्या निर्धारणाची प्रत राज्य शासनास, आयुक्तास व उप-संचालकास पाठवील.

**बाधित परिमंडल व लाभान्वित परिमंडल तात्पुरते घोषित करणे.**

१४. (१) कलम १३ खालील आकारणीची प्रत मिळाल्यानंतर लवकरात लवकर, राज्य शासन, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी करून, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, आणि कलम ११, पोट-कलम (२) मध्ये तरतूद केलेल्या रीतीनेसुद्धा—

(अ) प्रकल्पासाठी आवश्यक असलेले आणि प्रकल्पाद्वारे किंवा त्यामुळे प्रतिकूल परिणाम होणार असेल असे क्षेत्र ; आणि

(ब) प्रकल्प हा पाटबंधारे प्रकल्प असेल किंवा पाटबंधारे प्रकल्प, वीज प्रकल्प आणि सार्वजनिक उपयुक्ततेचा इतर कोणताही प्रकल्प किंवा त्याचा कोणताही संयोग यांचा समावेश असलेला संयुक्त प्रकल्प असेल तर, प्रकल्पाचा लाभ मिळण्याची शक्यता असलेले प्रकल्पाच्या जलप्रदायक्षेत्रामधील क्षेत्र, तात्पुरते घोषित करील.

(२) पोट-कलम (१) खालील घोषणेद्वारे, पोट-कलम (१) च्या खंड (अ) किंवा खंड (ब) मध्ये निर्दिष्ट केलेल्या क्षेत्रातील कोणतीही जमीन समाविष्ट करण्यास, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या तीस दिवसांपेक्षा कमी नाही अशा मुदतीत, आक्षेप किंवा त्यासाठी सूचना मागविण्यात येतील.

(३) अधिसूचनेची प्रत आयुक्त, उप-संचालक आणि पुनर्वसाहत अधिकारी यांच्याकडे पाठवण्यात येईल आणि तो त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे अधिसूचनेशी संबंधित अशा सूचना करू शकेल.

**बाधित परिमंडल व लाभान्वित परिमंडल अंतिमरीत्या घोषित करणे आणि अशा परिमंडलांमध्ये बदल करण्याची शक्ती.**

१५. (१) राज्य शासन, कलम १४ खालील अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मुदतीच्या आत आलेल्या आक्षेपांचा व सूचनांचा विचार केल्यानंतर, त्या अधिसूचनेचा परिणाम होणाऱ्या व्यक्तींना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देऊन आणि त्यास योग्य वाटेल अशी आणखी चौकशी करून, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि कलम ११, पोट-कलम (२) मध्ये उपबंधित केलेल्या रीतीनेसुद्धा,—

(अ) प्रकल्पाखालील बाधित परिमंडलाचे क्षेत्र बनणाऱ्या क्षेत्राची मर्यादा ;

(ब) प्रकल्प हा कलम १४, पोट-कलम (१) च्या खंड (ब) खाली येणारा प्रकल्प असेल तर, प्रकल्पाखालील लाभान्वित परिमंडलाचे क्षेत्र बनणाऱ्या क्षेत्राची मर्यादा;

अंतिम रीत्या घोषित करील.

(२) अधिसूचनेची प्रत आयुक्त, उप-संचालक आणि पुनर्वसाहत अधिकारी यांना पाठविण्यात येईल.

(३) प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या काळात कोणत्याही वेळी, बाधित परिमंडल किंवा लाभान्वित परिमंडल यात कोणताही बदल करणे आवश्यक आहे याबद्दल पुनर्वसाहत अधिकाऱ्याची खात्री होईल तर, तो असा बदल उप-संचालक आणि आयुक्त यांच्यामार्फत राज्य शासनास, कळवील ; आणि अशा बदलासंबंधीचे कोणतेही नकाशे व तपशील राज्य शासनाकडे त्याचप्रमाणे पाठवील.

(४) पोट-कलम (३) अन्वये कळविण्यात आलेली माहिती मिळाल्यानंतर, राज्य शासन, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यावर, अशा बदलासंबंधात तात्पुरती व अंतिम घोषणा कलम १४ व हे कलम यांच्या उपबंधानुसार करील.

या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्याची शक्ती.

१६. (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही जमीन खरेदी करण्यासाठी किंवा तिची अदलाबदल करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीशी करार करता येईल.

(२) या कलमाच्या उपबंधांस अधीन राहून, राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, भूमि-संपादन अधिनियम, १८९४ खाली सक्तीनेसुद्धा जमीन संपादन करता येईल, आणि उक्त प्रयोजनांसाठी केलेले कोणत्याही जमिनीचे संपादन हे, त्या अधिनियमाच्या अर्थान्तर्गत सार्वजनिक प्रयोजन असल्याचे मानण्यात येईल.

(३) राज्य शासनास, व्यवहार्य असेल तेथवर, या सोबतच्या अनुसूची 'अ' च्या **भाग एक** च्या उपबंधांस अनुसरून बाधित परिसंडलातील गावठाणात समाविष्ट केलेल्या जमिनीसुद्धा संपादन करता येतील.

(४) विस्थापित व्यक्तींची जमिनीवर पुनर्वसाहत करण्याच्या प्रयोजनार्थ, राज्य शासनास, या बाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांस अधीन राहून, व्यवहार्य असेल तेथवर, या सोबतच्या 'अनुसूची 'अ' च्या **भाग दोन** च्या उपबंधांस अनुसरून लाभान्वित परिमंडलातील किंवा कलम १० अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही गावातील किंवा क्षेत्रातील धारण जमिनीमधून जमीन संपादन करता येईल.

(५) या कलमान्वये संपादन केलेली सर्व जमीन ही, भूमि संकोषाचा भाग बनेल.

विवक्षित उपबंधांनुसार विस्थापित व्यक्तींना द्यावयाच्या जमिनीची मर्यादा.

१७. (१) राज्य शासनास, या कलमाच्या उपबंधांस अधीन राहून व्यवहार्य असेल तेथवर यासोबतच्या अनुसूची 'ब' च्या **भाग एक** च्या उपबंधास अनुसरून आणि विहित करण्यात येतील अशा शर्तींना अधीन राहून विस्थापित व्यक्तींना (गावठाणाची जमीन नसलेली) जमीन देता येईल.

(२) विस्थापित व्यक्तींच्या कुटुंबातील व्यक्तींची संख्या ५ पेक्षा अधिक असेल तर त्या कुटुंबास द्यावयाच्या एकूण जमिनीचे क्षेत्र हे, २ हेक्टर आणि ८३·३८ आर (७ एकर) पेक्षा अधिक होणार नाही. या शर्तीस अधीन राहून, प्रत्येक ३ जादा व्यक्तीमागे जादा ४०·४७ आर जमीन देता येईल.

(३) विस्थापित शेतमजुरांनी इतर विस्थापित व्यक्तींबरोबर बाधित परिमंडलातील आपली गावे सोडली असतील आणि अशा इतर विस्थापित व्यक्तींची या अधिनियमाखालील जमिनीवर पुनर्वसाहत करण्यात आली असेल तर, त्यांना ४०·४७ आर इतकी जमीन देता येईल.

(४) प्रत्येक विस्थापित व्यक्तीस किंवा शेतमजुरास किमान १ हेक्टर आणि ६१·८७ आर (४ एकर) या दराने, लाभान्वित परिमंडलातील जमिनीव्यतिरिक्त इतर ठिकाणच्या कोरडवाहू (जिरायत) जमिनी देता येतील. परंतु कमालमर्यादा ही शासकीय जमिनींच्या विल्हेवाटीसाठी अधिनियमान्वये केलेल्या; कोणत्याही नियमानुसार असेल.

(५) राज्य शासनास, यासोबतच्या अनुसूची 'ब' च्या **भाग दोन** च्या उपबंधांस अनुसरून विस्थापित व्यक्तींना नवीन गावठाणातील किंवा विद्यमान गावठाणाच्या विस्तारित भागातील जमिनीचे भूखंड देता येतील.

(६) विस्थापित व्यक्तीला, पर्यायी जमीन देताना, अशा जमिनीचे मूल्य हे सामान्यत: विस्थापित व्यक्तीला बाधित परिमंडलातील प्रकल्पासाठी संपादन करण्यात आलेल्या तिच्या जमिनीबद्दल मिळालेल्या रकमेइतके असेल आणि द्यावयाच्या पर्यायी जमिनीचे क्षेत्र हे या कलमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशी जमीन देण्यात आल्यानंतर विस्थापित व्यक्तीच्या धारणजमिनीचा एकूण विस्तार, शासकीय जमिनीची विल्हेवाट लावण्यासाठी अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे तरतूद करण्यात आलेल्या निर्वाहक धारणजमिनीपेक्षा अधिक होणार नाही अशाप्रकारे निर्धारित करण्यात येईल.

(७) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ याचे उपबंध, पुनर्वसाहत करावयाच्या विस्थापित व्यक्तींची संख्या आणि पुनर्वसाहतीसाठी अनुसूची 'अ' अनुसार उपलब्ध असलेल्या जमिनीची मर्यादा या गोष्टी लक्षात घेऊन अनुसूची 'अ' मध्ये सुधारणा करता येईल.

१८. (१) या कलमाच्या उपबंधास अधीन राहून, कलम १७ अन्वये देण्यात यावयाच्या भोगाधिकार जमिनींच्या संबंधात देय असलेले भोगाधिकार मूल्य हे,— भोगाधिकार मूल्य.

(अ) लाभान्वित परिमंडलातील धारणजमिनींमधून किंवा कलम १० अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही गावांमधून किंवा क्षेत्रांमधून, संपादन केलेल्या शेतजमिनींच्या बाबतीत, त्यांच्या संपादनाकरिता देण्यात आलेली भरपाईची रक्कम किंवा त्यांचे चालू बाजार मूल्य यांपैकी जे अधिक असेल तेवढे आणि अशा रीतीने संपादन करण्यात आलेल्या सर्व जमिनींच्या सीमांकनावर अशा जमिनींच्या समतलनावर, जमीन सुधारणेवरील कोणतीही असल्यास, संयुक्त मोजणीवर, सीमाचिन्हे किंवा दगड लावण्यावर आणि मंजुरीवर करण्यात आलेला खर्च एवढ्या रकमेइतके असेल ;

(ब) सरकारी शेतजमिनींच्या बाबतीत, शासकीय जमिनींच्या विल्हेवाटीसाठी अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांच्या उपबंधांनुसार असेल ;

**स्पष्टीकरण.**—(एक) आकारणी न केलेल्या जमिनींच्या बाबतीत, भोगाधिकार मूल्य, हे, समान दर्जाच्या आणि तशाच जागी असलेल्या लगतच्या जमिनींवर बसविता येईल अशी आकारणी लक्षात घेऊन देय असेल;

(दोन) लगतच्या जमिनी समान दर्जाच्या आहेत किंवा तशाच जागी आहेत किंवा कसे या प्रश्नाचा निर्णय राज्य शासनाकडून देण्यात येईल आणि त्या प्रश्नावरील राज्य शासनाचा निर्णय अंतिम आणि निर्णायक असेल ;

(क) त्या प्रयोजनासाठी संपादन करण्यात आलेल्या जमिनींवर स्थापन करण्यात आलेल्या नवीन गावठाणातील जमिनींच्या बाबतीत, सार्वजनिक प्रयोजनासाठी राखून ठेवण्यात आलेल्या जमिनींच्या संबंधातील अशा खर्च धरून, खंड (अ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या खर्चाची रक्कम अधिक त्यांच्या संपादनाकरिता देण्यात आलेल्या भरपाईच्या रकमेएवढे असेल ;

(ड) सरकारी जमिनींवर स्थापन करण्यात आलेल्या नवीन गावठाणातील जमिनींच्या बाबतीत, खंड (क) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या खर्चाच्या रकमेएवढे असेल.

(२) विस्थापित व्यक्तीला देण्यात आलेल्या जमिनींसाठी पोट-कलम (१) च्या खंड (अ) अन्वये तिच्याकडून देय असलेले भोगाधिकार मूल्य निर्धारित करण्याच्या प्रयोजनाकरिता, प्रथम भरपाईची रक्कम किंवा बाजार मूल्य यांपैकी जी रक्कम अधिक असेल ती रक्कम आणि उक्त खंड (अ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या खर्चाची रक्कम यास संपादन केलेल्या, जमिनींच्या त्या खंडामध्ये निर्दिष्ट केलेल्या, हेक्टरमधील एकूण क्षेत्राने भागून अशा जमिनींच्या प्रत्येक हेक्टरला देय असलेले भोगाधिकार मूल्य काढण्यात येईल. त्यानंतर अशा जमिनींच्या संबंधात देय असलेले भोगाधिकार मूल्य हे, अशा रीतीने काढण्यात आलेल्या जमिनीच्या दर हेक्टरला देय असलेल्या भोगाधिकार मूल्याची रक्कम गुणिले अशा जमिनीचे क्षेत्र याएवढे असेल.

(३) (अ) जमिनींच्या प्रत्येक भूखंडासाठी पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये देय असलेले भोगाधिकार मूल्य निर्धारित करण्याच्या प्रयोजनाकरिता, भरपाईची रक्कम आणि त्या खंडात निर्दिष्ट केलेल्या खर्चाची रक्कम, यास नवीन गावठाणाच्या प्रयोजनाकरिता किंवा विद्यमान गावठाणाच्या विस्ताराच्या प्रयोजनाकरिता आवश्यक असलेल्या चौरस मीटरमधील जमिनींच्या एकूण क्षेत्राने भागून, प्रथम, जमिनीच्या दर चौरस मीटरला देय असलेले भोगाधिकार मूल्य काढण्यात येईल. त्यानंतर जमिनीच्या प्रत्येक भूखंडाच्या संबंधात देय असलेले भोगाधिकार मूल्य हे, अशा रीतीने काढण्यात आलेल्या जमिनीच्या दर चौरस मीटरला देय असलेल्या भोगाधिकार मूल्याची रक्कम गुणिले अशा प्रत्येक भूखंडाचे चौरस मीटरमधील क्षेत्र याएवढे असेल ;

(ब) जमिनीच्या प्रत्येक भूखंडासाठी पोट-कलम (१) च्या खंड (ड) अन्वये देय असलेले भोगाधिकार मूल्य निर्धारित करण्याच्या प्रयोजनाकरिता त्या खंडात निर्दिष्ट केलेल्या खर्चाच्या रकमेस जिच्यावर गावठाण किंवा विद्यमान गावठाणाचा विस्तारित भाग वसविण्यात आला असेल त्या जमिनीच्या मीटरमधील एकूण क्षेत्राने भागून, जमिनीच्या दर चौरस मीटरमागे देय असलेले भोगाधिकार मूल्य प्रथम काढण्यात येईल, आणि त्यानंतर, या पोट-कलमाच्या खंड (अ) चे उपबंध, जमिनीच्या प्रत्येक भूखंडासाठी देय असलेले भोगाधिकार मूल्य निर्धारित करण्यास लागू होतील.

(४) कोणत्याही विस्थापित व्यक्तीस या अधिनियमान्वये देण्यात आलेल्या नवीन गावठाणातील किंवा विद्यमान गावठाणाच्या विस्तारित भागातील जमिनींच्या बाबतीत देय असलेले, या कलमान्वये काढलेले भोगाधिकार मूल्य हे, जुन्या गावठाणातील तिच्या जमिनींच्या बाबतीत तिला मिळालेल्या भरपाईच्या रकमेपेक्षा अधिक असेल तर, जुन्या गावठाणातील तिच्या जमिनीचे क्षेत्र किंवा नव्या गावठाणातील किंवा विद्यमान गावठाणाच्या विस्तारित भागातील तिच्या जमिनीचे क्षेत्र काहीही असले तरी, या अधिनियमान्वये तिला देण्यात आलेल्या नवीन गावठाणातील जमिनीच्या बाबतीत तिने द्यावयाचे भोगाधिकार मूल्य हे, जुन्या गावठाणातील तिच्या जमिनीच्या बाबतीत तिला मिळालेल्या भरपाईच्या रकमेइतके असेल ; आणि भोगाधिकार मूल्याची अतिरिक्त रक्कम राज्य शासनाकडून सोसण्यात येईल.

(५) नवीन गावठाणात जिला जमीन देण्यात आली आहे अशा विस्थापित व्यक्तीस, कोणत्याही कारणाने, जुन्या गावठाणातील तिच्या जमिनीबद्दल कोणतीही भरपाई मिळालेली नसेल तर, अशा विस्थापित व्यक्तीकडून, तिला देण्यात आलेल्या नवीन गावठाणातील किंवा विद्यमान गावठाणाच्या विस्तारित भागातील जमिनीबद्दल कोणतेही भोगाधिकार मूल्य देय होणार नाही.

(६) उपरोक्तप्रमाणे देय असलेल्या भोगाधिकार मूल्याव्यतिरिक्त, अनुदानग्राही, जमिनीवर उभ्या असलेल्या, कोणतीही असल्यास, झाडांच्या मूल्याची, त्या जिल्ह्याच्या विभागीय वन अधिकाऱ्याशी विचारविनिमय करून उप संचालकाकडून ठरविण्यात येईल अशी रक्कम देण्यास पात्र असेल.

(७) भोगाधिकार मूल्य हे विहित करण्यात येईल अशा रीतीने ठोक रकमेत किंवा विहित करण्यात येईल अशा हप्त्यांनी देय असेल.

विस्थापित व्यक्तींना पुनर्वसाहतीसाठी जमीन हवी असेल तर तसे निवेदन करण्यास फर्मावणारी जाहीर नोटीस.

१९. (१) पुनर्वसाहत अधिकारी, कलम १३ अन्वये आकारणी करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, शासकीय राजपत्रात आणि कलम ११, पोट-कलम (२) द्वारे उपबंधित केल्याप्रमाणे एक जाहीर नोटीस प्रसिद्ध करील आणि बाधित परिमंडलातील विस्थापित व्यक्तींना, कलम १८ अन्वये उपबंधित केलेल्या भोगाधिकार मूल्यावर पुनर्वसाहतीसाठी जमीन हवी आहे किंवा कसे हे त्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपूर्वी (शासकीय राजपत्रात नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांपेक्षा अगोदरची नसलेली) त्यात लेखी कळविण्याचे आवाहन करील आणि तशी ती हवी असल्यास, उपरोक्त तारखेपूर्वी, पुढील तपशील अंतर्भूत असलेले निवेदन दोन प्रतींत त्यास सादर करण्यास फर्मावील :—

(अ) बाधित परिमंडलात भोगवटादार म्हणून किंवा कूळ म्हणून प्रत्येक विस्थापित व्यक्तीने स्वतंत्रपणे धारण केलेल्या जमिनीचे क्षेत्र ;

(ब) लाभान्वित परिमंडलात किंवा त्या परिमंडलाबाहेर कलम १० अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही गावात किंवा क्षेत्रात भोगवटादार म्हणून किंवा कूळ म्हणून प्रत्येक विस्थापित व्यक्तीने धारण केलेल्या, कोणतीही असल्यास, जमिनीचे क्षेत्र ;

(क) ज्या जमिनीवर ती शेतमजूर म्हणून काम करीत होती त्या जमिनीचे वर्णन ;

(ड) जुन्या गावठाणातील निवासाची जागा आणि विस्थापित व्यक्ती ती जागा मालक म्हणून किंवा भाडेकरू म्हणून धारण करीत आहे किंवा कसे ; आणि

(ई) लाभान्वित परिमंडलात किंवा कलम १० अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या गावात किंवा क्षेत्रात शेतमजूर म्हणून देण्याच्या किंवा शेतमजूर म्हणून तिच्यावर काम करण्याच्या प्रयोजनांसाठी जमिनीची निवड आणि नवीन गावठाणातील किंवा यथास्थिति विद्यमान गावठाणाच्या विस्तारित भागातील जमिनीची निवड.

(२) पुनर्वसाहत अधिकारी, पोट-कलम (१) अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या नोटिशीस शक्य असेल तितक्या मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी देण्यात आली असल्याचे सुनिश्चित करण्याची विशेष काळजी घेईल आणि त्यास, त्या प्रयोजनासाठी, नोटिशीतील मजकूर विस्थापित व्यक्तींना समजावा म्हणून प्रत्येक प्रकरणातील परिस्थितीनुसार त्यास योग्य वाटेल असे सहाय्य त्यांना देता येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये मिळालेल्या निवेदनाची एक प्रत, उप संचालकाकडे पाठविण्यात येईल

२०. (१) कलम १० अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, विस्थापित व्यक्तींची पुनर्वसाहत करण्यास राज्य शासनास समर्थ करण्यासाठी, पुनर्वसाहत अधिकारी शक्य तितक्या लवकर, कलम १९ अन्वये मिळालेल्या निवेदनाच्या आधारे (आणि कलम १३ अन्वये करण्यात आलेल्या जमिनीच्या आकारणीच्या आधारे) विस्थापित व्यक्तींच्या पुनर्वसाहतीसाठी एका किंवा अधिक योजनांचे मसुदे तयार करील. त्या योजनेमध्ये पुढील तपशील अंतर्भूत असेल :— पुनर्वसाहत अधिकाऱ्याने पुनर्वसाहतींच्या योजनेचा मसुदा तयार करणे.

(अ) बाधित परिमंडलाचे क्षेत्र आणि प्रकल्पामुळे बाधा पोहोचलेल्या गावांची संख्या यांचा त्यामध्ये निर्देश करून प्रकल्पात अंतर्भूत केलेल्या क्षेत्राची व्याप्ती; क्षेत्र आणि गावे यांचा निर्देश करणारा एक नकाशा योजनेच्या मसुद्यासोबत जोडण्यात येईल ;

(ब) धारण जमीन प्रकल्पाच्या पाण्याखाली बुडण्याचा दिनांक;

(क) विस्थापित व्यक्तींची (शेतमजूर नसलेल्या) यादी आणि बाधित परिमंडलात प्रत्येक व्यक्तीने धारण केलेल्या धारण जमिनीचे भूमापन क्रमांक दर्शवून तिच्या धारण जमिनीची व्याप्ती; आणि अशा परिमंडलातील शेत मजुरांची यादी व त्याने त्या परिमंडलात धारण केलेल्या, कोणतीही असल्यास, जमिनीची व्याप्ती आणि ज्यांच्या जमिनीवर मुख्यतः शारीरिक श्रम करून तो आपली उपजीविका चालवीत असेल, अशा व्यक्तींची नावे;

(ड) बाधित परिमंडलातील गावठाणाचे क्षेत्र आणि त्यात मालकीची जमीन असणाऱ्या व्यक्तींची नावे व अशा जमिनीची व्याप्ती;

(ई) बाधित परिमंडलातील कुटुंबाची संख्या आणि प्रत्येक कुटुंबातील व्यक्तींची संख्या;

(फ) प्रकल्प पूर्ण झाल्यावर लाभ मिळणाऱ्या किंवा लाभ मिळण्याचा संभव असलेल्या व्यक्तींची यादी आणि लाभान्वित परिमंडलात अशा प्रत्येक व्यक्तीने धारण केलेल्या जमिनीची व्याप्ती;

(ग) विस्थापित व्यक्तींच्या पुनर्वसाहतीसाठी लाभान्वित परिमंडलातील आणि कलम १० अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या गावांतील आणि क्षेत्रांतील उपलब्ध जमिनीची व्याप्ती ;

(ह) विस्थापित व्यक्तींची नावे, प्रत्येक कुटुंबातील व्यक्तींची संख्या आणि भूमि संकोषामधून प्रत्येक विस्थापित व्यक्तीला देण्यासाठी प्रस्तावित केलेल्या जमिनीची व्याप्ती (ठिकाणाच्या तपशीलासह) आणि विस्थापित व्यक्तीने जे द्यावे लागेल असे भोगाधिकार मूल्य ;

(आय) लाभान्वित परिमंडलातील गावठाणाची जागा किंवा त्याच्या विस्ताराचे क्षेत्र किंवा यथास्थिति, नवीन गावठाण ज्या ठिकाणी वसवण्याचे प्रस्तावित केले असेल ते क्षेत्र नवीन गावठाणाची मांडणी आणि उपरोक्तप्रमाणे गावठाणाचा विस्तार दर्शविणारा नकाशा योजनेच्या मसुद्यासोबत जोडण्यात येईल ; मांडणीमध्ये नवीन गावठाणात किंवा यथास्थिति विद्यमान गावठाणाच्या विस्तारात तरतूद करण्याचे योजिलेल्या सार्वजनिक उपयुक्तता, सुखसोयी आणि सेवा स्पष्ट करण्यात येतील.

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनांसाठी, "सार्वजनिक उपयुक्तता आणि सुखसोयी" या शब्दप्रयोगामध्ये, पाण्याखाली गेलेल्या गावांतील विद्यमान मळणीच्या जमिनीचे स्वरूप आणि प्रकार, त्या पाण्याखाली गेलेल्या गावातील स्मशान आणि दफनभूमी या प्रयोजनांसाठी अस्तित्वात असलेल्या जमिनींचा विस्तार वेगवेगळ्या जातींची लोकसंख्या आणि पुनर्वसाहतीसाठी जमिनींची उपलब्धता या गोष्टी विचारात घेऊन पुनर्वसाहत करण्यात आलेल्या गावामध्ये, मळणीसाठी जमीन, स्मशान आणि दफनभूमी यांसाठी याबाबतीत नियमामध्ये तरतूद करण्यात येईल, त्या मर्यादेपर्यंत जमीन राखून ठेवण्याच्या तरतुदीचा अंतर्भाव होतो;

(ज) विस्थापित व्यक्तींची नावे आणि नवीन गावठाणात किंवा यथास्थिति विद्यमान गावठाणाच्या प्रस्तावित विस्तारात पुनर्वसाहतीसाठी प्रत्येक कुटुंबाला देण्याचे योजिलेल्या जमिनीची व्याप्ती ;

(के) पुनर्वसाहत अधिकाऱ्यास विस्थापित व्यक्तींच्या माहितीसाठीं समाविष्ट करणे योग्य वाटेल असा इतर तपशील.

(२) योजनेच्या मसुद्यात, जमीन प्रकल्पाच्या पाण्याखाली बुडण्याच्या कार्यक्रमानुसार, बाधित परिमंडलातील विस्थापित व्यक्तींना नवीन गावठाणाकडे किंवा विद्यमान गावठाणाच्या प्रस्तावित विस्तारित भागाकडे हलविण्याच्या वेळापत्रकाचा निर्देश करण्यात येईल.

(३) पुनर्वसाहत अधिकाऱ्याने तयार केलेला योजनेचा मसुदा, त्याच्याकडून उप-संचालकास सादर करण्यात येईल आणि उप-संचालकास तो मसुदा सल्लागार समितीकडे सादर करता येईल आणि त्या समितीच्या कोणत्याही शिफारशी असल्यास, त्यानुसार योजनेमध्ये सुधारणा करता येईल.

(४) विस्थापित व्यक्तींना भोगाधिकार मूल्यावर द्यावयाचे योजिलेल्या शेतजमिनी आणि नवीन गावठाणाची जागा किंवा यथास्थिति, विद्यमान गावठाणाचा विस्तारित भाग त्यांना स्वतः पाहण्यासाठीं उप-संचालक विस्थापित व्यक्तींना सोयी उपलब्ध करून देईल असे योजनेच्या मसुद्यात नमूद करण्यात येईल.

(५) पोट-कलम (१) अन्वये तयार करण्यात आलेल्या योजनेच्या मसुद्याची एक प्रत, संचालकास, आयुक्तास आणि संबंधित जिल्हा परिषदेस सादर करण्यात येईल.

योजना प्रसिद्ध करणे व योजना मंजूर करणे.

२१. (१) कलम २० अन्वये पुनर्वसाहतीच्या योजनेच्या मसुद्याची प्रत मिळाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, उप-संचालक, सल्लागार समितीच्या शिफारशींवर विचार केल्यानंतर आणि त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर योजनेचा मसुदा **शासकीय राजपत्रात** व कलम ११, पोट-कलम (२) द्वारे उपबंधित केलेल्या रीतीनेसुद्धा प्रसिद्ध करील.

(२) योजनेच्या मसुद्याद्वारे, प्रत्येक विस्थापित व्यक्तीला तिचे योजनेच्या मसुद्यासंबंधीचे आक्षेप व सूचना, मसुदा **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून ४५ दिवसांच्या आत, पाठविण्याबद्दल आवाहन करण्यात येईल.

(३) उप-संचालकास, पोट-कलम (२) अन्वये यथोचित रीत्या मिळालेल्या कोणत्याही आक्षेपांवर व सूचनांवर विचार केल्यानंतर, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी करून कोणत्याही फेरबदलासह किंवा फेरबदलाशिवाय योजनेच्या मसुद्यास मंजुरी देता येईल आणि ती **शासकीय राजपत्रात** व कलम ११, पोट-कलम (२) द्वारे उपबंधित केलेल्या रीतीनेसुद्धा प्रसिद्ध करता येईल :

परंतु, फेरबदलामुळे बाधित होणाऱ्या व्यक्तींना त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय, कोणत्याही फेरबदलाशिवाय योजनेचा मसुदा मंजूर करण्यात येणार नाही.

(४) कोणत्याही योजनेचा भाग असणारा कोणताही आराखडा किंवा नकाशा या अधिनियमाद्वारे आवश्यक असल्याप्रमाणे प्रसिद्ध केला नाही तरी चालेल. परंतु आराखड्याची एक प्रत निरीक्षणासाठी पुनर्वसाहत अधिकाऱ्याच्या कार्यालयात खुली ठेवण्यात येईल.

(५) मंजूर केलेल्या योजनेच्या कोणत्याही उपबंधामुळे बाधा पोचलेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशी योजना **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत, आयुक्ताकडे अपील दाखल करता येईल आणि आयुक्तास, अशा व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर मंजूर योजनेत सुधारणा करता येईल किंवा तीत सुधारणा करण्याचे नाकारता येईल.

(६) राज्य शासनास, अर्ज केल्यावर किंवा अन्यथा, योजनेच्या मसुद्यात किंवा मंजूर योजनेत करण्यात आलेल्या कोणत्याही उपबंधांच्या अचूकतेविषयी किंवा अन्वथा स्वतःची खात्री करून घेण्यासाठी, योजनेचा मसुदा किंवा मंजूर योजना यासंबंधातील कामकाजाचा अभिलेख मागविता येईल, आणि अशा सुधारणेमुळे बाधा पोचलेल्या पक्षकारास किंवा पक्षकारांस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर मंजूर योजनेत सुधारणा करता येईल.

२२. (१) नवीन गावठाणाच्या किंवा यथास्थिति, विद्यमान गावठाणांच्या विस्ताराच्या प्रत्येक मांडणीचे कार्यान्वयन, त्याची सार्वजनिक उपयुक्तता, सुखसोयी आणि सेवा व त्यांचे परिरक्षण यांच्याशी त्याचा संबंध असेल तेथवर, राज्य शासनाकडून लेखी आदेशाद्वारे, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटींस व शर्तीस (जिल्हा परिषदेकडे त्या निहित करण्याच्या उपबंधांसह) अधीन राहून मांडणीत समाविष्ट असलेल्या क्षेत्रावर अधिकारिता असणाऱ्या जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात येईल आणि त्यानंतर, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ याच्या कलम १२३ चे उपबंध, त्या कलमान्वये जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आलेल्या कामांच्या किंवा विकास योजनांच्या कार्यान्वयनास आणि परिरक्षणास ते जसे लागू होतात तसेच अशा मांडणीच्या कार्यान्वयनास आणि त्याच्या परिरक्षणासुद्धा लागू होतील. मांडणीचे कार्यान्वयन जिल्हा परिषदकडे सोपवणे.

(२) सार्वजनिक उपयुक्तता, सुखसोयी आणि सेवा यांच्या संबंधातील कामांचे कार्यान्वयन जलद गतीने होते आहे हे सुनिश्चित करण्यासाठी आणि त्यांच्या समुचित परिरक्षणासाठी राज्य शासन, जिल्हा परिषदेस आवश्यक तो निधी देण्याची व्यवस्था करील आणि त्या प्रयोजनासाठी, राज्य शासनास, प्रत्येक प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेऊन, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे आदेश देता येतील.

## प्रकरण चार

### जमीन देणे

२३. (१) मंजूर केलेली योजना कलम २१ अन्वये, शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आल्यानंतर, उप संचालक, कलम २५ च्या उपबंधांस अधीन राहून भोगाधिकार मूल्य भरल्यावर विस्थापित व्यक्तीला मंजूर योजनेच्या उपबंधांनुसार जमीन देईल; आणि त्यानंतर, या अधिनियमा-द्वारे स्पष्टपणे उपबंधित करण्यात आले असेल त्याव्यतिरिक्त, अधिनियमाचे व तदन्वये केलेल्या नियमांचे सरकारी जमिनीच्या विल्हेवाटीची तरतूद करणारे उपबंध, अधिनियमान्वये देण्यात आलेल्या सरकारी जमिनींच्या बाबतीत जसे लागू होतात, तसेच अशा (जमिनी) देण्यासही लागू होतील. भोगाधिकार मूल्य भरल्यावर जमीन देणे.

(२) विस्थापित व्यक्तींपैकी कोणत्याही व्यक्तीस देण्यात आलेल्या शेत जमिनीच्या संबंधात तिच्याकडून देय असलेले भोगाधिकार मूल्य पोट-कलम (१) मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे तिने दिलेले नसेल त्याबाबतीत, पोट-कलम (१) अन्वये जमीन देण्यात विलंब झाल्यास त्याच्या परिणामी जमीन पडीत राहण्याची शक्यता आहे, याबद्दल उप संचालकाची खात्री झाल्यास, त्यास, पुढील शर्तींच्या अधीन, मंजूर योजना शासकीय राजपत्रात ज्या दिनांकास प्रसिद्ध करण्यात आली असेल त्या दिनांकाच्या लगतनंतरच्या कृषि वर्षाच्या प्रारंभापासून ती जमीन अशा विस्थापित व्यक्तीच्या ताब्यात देता येईल :—

(एक) विस्थापित व्यक्तीने भोगाधिकार मूल्य देण्यात कसूर केल्यास, तिने मंजूर योजनेत उपबंधित केल्याप्रमाणे जमीन देण्यासंबंधातील आपला हक्क गमावला असल्याचे मानण्यात येईल;

(दोन) अशा कसुरीच्या बाबतीत, उप संचालकाकडून निश्चित करण्यात येईल असा खंड राज्य शासनास दिल्यावर अशी जमीन, केवळ उक्त कृषि वर्ष संपेपर्यंतच पट्टेदार म्हणून ती जमीन तिच्या ताब्यात राहण्याचे चालू राहील;

(तीन) उक्त कृषि वर्ष संपल्यावर, विस्थापित व्यक्ती अशी जमीन सोडून देईल व तसे करण्यात तिने कसूर केल्यास, अधिनियमाच्या उपबंधांनुसार तडकाफडकी निष्कासित केली जाण्यास ती पात्र असेल;

(चार) विस्थापित व्यक्तीने जमीन सोडल्यानंतर किंवा शर्त (तीन) मध्ये उपबंधित केल्या-प्रमाणे तिला जमिनीवरून निष्कासित करण्यात आल्यानंतर भोगाधिकार मूल्य देऊन सरकारी जमिनी देण्याच्या बाबतीत, अधिनियमाचे व तदन्वये केलेल्या नियमांचे उपबंध यांनुसार त्या जमिनीची विल्हेवाट लावण्यात येईल;

(पाच) विस्थापित व्यक्ती खंड देण्यात कसूर करील तर, असा खंड तिच्याकडून जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुलीयोग्य असेल.

**विवक्षित प्रकरणांमध्ये जमीन इतरांना देण्याची उप संचालकाची शक्ती.**

२४. कोणत्याही विस्थापित व्यक्तीने तिला दिलेल्या जमिनीच्या बाबतीत या अधिनियमान्वये आवश्यक असल्याप्रमाणे, भोगाधिकार मूल्य देण्यात कसूर केल्यास तिने मंजूर योजनेत उपबंधित केल्याप्रमाणे जमीन देण्यासंबंधातील आपला हक्क गमावला असल्याचे मानण्यात येईल; व उप संचालकाने त्याच्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत तिने भोगाधिकार मूल्य दिल्यावर एक तर उक्त विस्थापित व्यक्तीस जमीन परत देणे किंवा भोगाधिकार मूल्य देण्याची हमी देणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तीस अशा जमिनीचा धारणाधिकार नव्याने देणे विधिसंमत असेल आणि त्यानंतर, ती योजना त्यानुसार सुधारण्यात आल्याचे मानण्यात येईल.

**भार बदलणे.**

२५. (१) विस्थापित व्यक्तीकडून बाधित परिमंडलात धारण करण्यात आलेल्या कोणत्याही जमिनीवर गहाण, कर्ज किंवा अन्य कोणत्याही भाराचा बोजा असेल त्याबाबतीत, असे गहाण, कर्ज किंवा अन्य भार त्या जमिनीवरून बदली झाल्याचे व अशा विस्थापित व्यक्तीला कलम २३ अन्वये देण्यात आलेल्या जमिनीशी संलग्न झाले असल्याचे मानण्यात येईल व गहाणदार, धनको किंवा यथास्थिति अन्य भारस्वामी त्यानुसार आपल्या अधिकारांचा वापर करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये गहाण, कर्ज किंवा अन्य भार ज्या जमिनीवर बदली झाला असेल त्या जमिनीचे बाजारमूल्य, असे गहाण, कर्ज किंवा अन्य भार ज्या जमिनीवरून बदली झाला असेल त्या मूळ जमिनीच्या बाजारमूल्यापेक्षा कमी असेल तर, गहाणदार, धनको किंवा यथास्थिति अन्य भारस्वामी हा, उप संचालकाकडून ठरवून देण्यात येईल इतकी नुकसानभरपाई अशा जमिनीचा मालक असलेल्या विस्थापित व्यक्तीकडून मिळण्यास हक्कदार असेल.

## प्रकरण पाच

### संकीर्ण

**खोट्या प्रतिज्ञापनाबद्दल शास्ती.**

२६. कोणतीही व्यक्ती, या अधिनियमान्वये जाणूनबुजून खोटे प्रतिज्ञापन किंवा निवेदन करील तर, तिला, दोषसिद्धीनंतर, एक हजार रुपयांपर्यंत वाढू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल :

परंतु असे की, न्यायालयाने आपल्या न्यायनिर्णयात उल्लेख करावयाची अशी एतद्विरुद्ध विशेष व वाजवी कारणे नसतील तेव्हा असा दंड शंभर रुपयांपेक्षा कमी असणार नाही.

**शासनाच्या आणि स्थानिक प्राधिकरणांच्या अधिकाऱ्यांची साहाय्य करण्याची शक्ती.**

२७. कोणत्याही विभागातील शासनाचा प्रत्येक अधिकारी आणि स्थानिक प्राधिकरणाचा प्रत्येक अधिकारी व कर्मचारी हा, कोणत्याही पुनर्वसाहत अधिकाऱ्यास किंवा उप संचालकास, प्रकल्प अभियंत्यास किंवा या अधिनियमाचे उपबंध पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ यथोचितरीत्या प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास साहाय्य करण्यास बांधलेला असेल.

**या अधिनियमान्वये नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी लोकसेवक असणे.**

२८. या अधिनियमान्वये नियुक्त केलेले सर्व अधिकारी व कर्मचारी हे, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**अधिकारितेची मर्यादा.**

२९. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये जो संचालकाने, आयुक्ताने, उप संचालकाने, पुनर्वसाहत अधिकाऱ्याने किंवा राज्य शासनाने निश्चित करणे, ज्याच्या संबंधात निर्णय घेणे किंवा कामकाज करणे आवश्यक असेल असा कोणताही प्रश्न निश्चित करण्याची, त्यासंबंधात निर्णय घेण्याची किंवा कामकाज करण्याची अधिकारिता कोणत्याही दिवाणी न्यायालयास असणार नाही.

३०. या अधिनियमान्वये जी सद्हेतूने केली असेल किंवा करण्याचे अभिप्रेत असेल अशा कोणत्याही गोष्टीबद्दल राज्य शासन, स्थानिक प्राधिकरण किंवा कोणताही लोकसेवक यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही. **या अधिनियमान्वये केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.**

३१. (१) राज्य शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे आणि पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, या अधिनियमाच्या प्रयोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी नियम करता येतील. अशा नियमांत, या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी फी आकारण्याची तरतूद करता येईल. **नियम.**

(२) ह्या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील व असा निर्णय शासकीय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येईल किंवा यथास्थिति येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

## अनुसूची अ

(कलम १६ पहा)

### भाग एक

| प्रकल्पासाठी संपादन केलेल्या गावठाणातील घरांची टक्केवारी | संपादन करावयाच्या गावठाणात समाविष्ट असलेल्या जमिनी (हेक्टरमध्ये) |
|---|---|
| (अ) प्रकल्पासाठी संपादन केलेल्या गावठाणातील घरांच्या ७५ टक्क्यांपेक्षा कमी. | काही नाही. |
| (ब) प्रकल्पासाठी संपादन केलेल्या गावठाणातील घरांच्या ७५ टक्के. | संपूर्ण गावठाणात समाविष्ट केलेल्या सर्व जमिनी. |
| (क) गावठाणात समाविष्ट केलेले क्षेत्र प्रकल्पासाठी संपादन करण्यात आलेले नाही, परंतु गावातील शेत जमिनींच्या ७५ टक्क्यांपेक्षा अधिक जमिनी संपादन करण्यात आलेल्या आहेत आणि गावातील लागवडीसाठी उपलब्ध असलेल्या उर्वरित क्षेत्राची व्याप्ती, गावाच्या लागवड केलेल्या क्षेत्राच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी आहे. | संपूर्ण गावठाणात समाविष्ट केलेल्या सर्व जमिनी. |

भाग दोन

| धारण जमिनीचा विस्तार | संपादन करावयाचे क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|
| (अ) ३ हेक्टर आणि २३·७५ आर (८ एकर) पेक्षा जास्त नसलेला. | काही नाही. |
| (ब) ३ हेक्टर आणि २३·७५ आर (८ एकर) पेक्षा जास्त आणि ४ हेक्टर आणि ८५·६२ आर (१२ एकर) पेक्षा जास्त नसलेला. | ३ हेक्टर आणि २३·७५ आर (८ एकर) पेक्षा जास्त असलेले परंतु ८०·९४ आर (२ एकर) पेक्षा जास्त नसलेले क्षेत्र. |
| (क) ४ हेक्टर आणि ८५·६२ आर (१२ एकर) पेक्षा जास्त आणि ६ हेक्टर आणि ४७.४९ आर (१६ एकर) पेक्षा जास्त नसलेला. | ४ हेक्टर आणि ०४·६८ आर (१० एकर) पेक्षा जास्त असलेले परंतु १ हेक्टर आणि २१·४१ आर (३ एकर) पेक्षा जास्त नसलेले क्षेत्र. |
| (ड) ६ हेक्टर आणि ४७·४९ आर (१६ एकर) पेक्षा जास्त आणि ८ हेक्टर आणि ०९·३७ आर (२० एकर) पेक्षा जास्त नसलेला. | ५ हेक्टर आणि २६·०९ आर (१३ एकर) पेक्षा जास्त असलेले परंतु १ हेक्टर आणि ६१·८७ आर (४ एकर) पेक्षा जास्त नसलेले क्षेत्र. |
| (इ) ८ हेक्टर आणि ०९·३७ आर (२० एकर) पेक्षा जास्त आणि ९ हेक्टर आणि ७१·२४ आर (२४ एकर) पेक्षा जास्त नसलेला. | ६ हेक्टर आणि ४७·४९ आर (१६ एकर) पेक्षा जास्त असलेले परंतु २ हेक्टर आणि ०२·३४ आर (५ एकर) पेक्षा जास्त नसलेले क्षेत्र. |
| (फ) ९ हेक्टर आणि ७१·२४ आर (२४ एकर) पेक्षा जास्त असलेला. | ७ हेक्टर आणि ६८·९० आर (१९ एकर) पेक्षा जास्त असलेले संपूर्ण क्षेत्र; |

परंतु खंड (ब) खाली येणाऱ्या धारण जमिनीच्या बाबतीत, जर भूमि संपादनामुळे त्या धारण जमिनीचा विस्तार ३ हेक्टर आणि २३·७५ आर. (८ एकर) पेक्षा कमी होणार असल तर अशा धारण जमिनीतून जमिनीचे संपादन केले जाणार नाही.

## अनुसूची 'ब'

(कलम १७ पहा)

भाग एक

| प्रकल्पाकरिता विस्थापित व्यक्तींनी गमावलेल्या जमिनीचे क्षेत्र (हेक्टरमध्ये) | लाभान्वित परिमंडलातून विस्थापित व्यक्तींना द्यावयाच्या जमिनीचे क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|
| १. ८०·९४ आर (२ एकर) पेक्षा जास्त नसलेले .. | ४०·४७ आर (१ एकर) पेक्षा कमी नाही परंतु ८०·९४ आर (२ एकर) पेक्षा जास्त नाही. |
| २. ८०·९४ आर (२ एकर) पेक्षा जास्त परंतु २ हेक्टर ०२.३४ आर (५ एकर) पेक्षा जास्त नसलेले. | ४०·४७ आर (१ एकर) पेक्षा कमी नाही परंतु १ हेक्टर आणि २१·४१ आर (३ एकर) पेक्षा जास्त नाही. |
| ३. २ हेक्टर आणि ०२·३४ आर (५ एकर) पेक्षा जास्त असलेले | ४०·४७ आर (१ एकर) पेक्षा कमी नाही परंतु १ हेक्टर ६१·८७ आर (४ एकर) पेक्षा जास्त नाही. |

भाग दोन

| विस्थापित व्यक्तींचा प्रवर्ग | | देण्यात आलेल्या गावठाण भूखंडाचे प्रमाण चौरस मीटरमध्ये |
| --- | --- | --- |
| १. शेतकरी आहे अशी विस्थापित व्यक्ती | (अ) तिच्या कुटुंबातील व्यक्तींची संख्या ५ पेक्षा अधिक नसेल तर ; | ३७१·६१२ चौ. मीटर |
| | (ब) तिच्या कुटुंबातील व्यक्तींची संख्या ५ पेक्षा अधिक असेल तर ; | ५५७·४१८ चौ. मीटर कमाल क्षेत्रास अधीन राहून, दर तीन जादा व्यक्तींसाठी ९२·९०३ चौ. मीटर अधिक. |
| २. शेतकरी नसलेली विस्थापित व्यक्ती | (अ) तिच्या कुटुंबातील व्यक्तींची संख्या ५ पेक्षा अधिक नसेल तर ; | १८५·८०६ चौ. मीटर. |
| | (ब) तिच्या कुटुंबातील व्यक्तींची संख्या ५ पेक्षा अधिक असेल तर ; | २७८·७०९ चौ. मीटर कमाल क्षेत्रास अधीन राहून, दर तीन जादा व्यक्तींसाठी, ४६·४५१५ चौ. मीटर अधिक. |

(यथार्थ अनुवाद)

य. शं. कानिटकर,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.